उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र
स्थापना : १९३५

ARTHA, Poona 4.

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २७ पुणें, बुधवार तारीख ६ डिसेंबर, १९६१ अंक ११

## विविध माहिती

**संगीताचा वनस्पतीवर परिणाम**—जबलपूर विद्यापीठांतील प्राध्यापक डॉ. गोरे ह्यांचे संगीताचे वनस्पतीपर होणारे परिणाम ह्या विषयावर व्याख्यान झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं वनस्पतींच्या वाढीवर संगीताचा अनुकूल परिणाम होतो. त्यांतल्या त्यांत भैरवी, मालकंस आणि नयतोडी ह्या रागांचा पिकांवर चांगला परिणाम होतो व तीं अधिक चांगलीं येतात.

**सरकारी नौकरांच्या मुलांचें शिक्षण**—मध्यवर्ती सरकारच्या नौकरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खास सवलती देण्याची एक योजना आंखण्यांत आली आहे. योजना दुसऱ्या पे कमिशनच्या शिफारशींवर आधारलेली आहे. योजनेंत समाविष्ट केल्या जाणाऱ्या शाळांत अभ्यासक्रम व शिक्षणाचें माध्यम एकच असणार आहे. फीहि माफक असणार आहे. योजना भारतामधील २७ शहरांतून प्रथम अमलांत आणण्यांत येणार आहे.

**साखरेच्या उत्पादनांतील कपात**—गेल्या दोन वर्षांत भारतामधील साखरेचें उत्पादन वाजवीपेक्षा अधिक झालें. त्यामुळें चालू वर्षी उत्पादनांत १० टक्के कपात करण्याची सक्ति भारत सरकारला करावी लागली. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत साखरेचें उत्पादन ४ टक्क्यांपेक्षा कमी होणार नाहीं. कारण, १० टक्के कपात कांहीं विवाक्षित प्रकारच्या साखर कारखान्यांनाच लागू करण्यांत येणार आहे.

**नाटकांत खऱ्या पिस्तुलाचा वापर**—लखनौपासून ७० मैलांवर असलेल्या एका गांवांत 'सुलताना डाकू' ह्या नांवाचें नाटक करण्यांत येत होतें. दरोडेखोरांच्या जीवनावर आधारलेल्या ह्या नाटकांत दरोडेखोराचें काम करणाऱ्या नटाचे हातीं एका प्रेक्षकानें खरें पिस्तुल दिलें होतें. नाटकाचा प्रयोग चालू असतां ह्या नटानें प्रेक्षकांवर पिस्तुल चालविलें. त्यामुळें नऊ जणांना जखमा झाल्या.

**पोलादाच्या कारखान्याचा विस्तार**—म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स ह्या पोलादाच्या कारखान्यांत दरसाल ३०,००० टन वजनाचे पोलादाचे ठोकळे तयार करण्यांत येतात. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्या कारखान्याचा विस्तार करण्यांत येणार आहे. विस्ताराची योजना पूर्ण झाल्यावर दरसाल १,००,००० ठोकळे तयार होऊं लागतील. विस्ताराच्या योजनेंत पोलाद तयार करण्यासाठी विजेची भट्टी उभारण्याच्या कामाचा समावेश आहे.

**हस्तस्पर्शानें रोगांचा परिहार!**—आंध्र राज्यांतील गणेशगड्डा नांवाच्या खेड्यांत गेल्या कांहीं महिन्यांत रोगग्रस्तांची रीघ लागलेली आहे. ह्या खेड्यांत ४ वर्षांच्या एका मुलाला त्याचे आईबाप आणीत असतात. ह्या मुलाच्या प्रत्यक्ष स्पर्शानें अगर त्यानें स्पर्श केलेल्या खाद्यपदार्थांचें सेवन केल्यानें रोगग्रस्त मुक्त होतात असें म्हणतात. ह्या खेड्यांत पूजेचें साहित्य विकणारीं बरींच दुकानें निघालीं असून त्यांचा धंदा जोरांत चालू आहे.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनचें दुसरें मूल्यमापन**—आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या दुसऱ्या मूल्यमापनाचा अहवाल लोकसभेपुढें ठेवण्यांत आला आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, सध्यांची अनुकूल परिस्थिति चालू राहिली तर विमेदारांना पूर्वीप्रमाणेंच बोनस देण्यांत येईल, इतकेंच नव्हे तर त्याहीपेक्षा अधिक प्रमाणांत बोनस वाटता येण्याची शक्यता आहे.

**पोलादाची आयात**—भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें ४८,००० हजार टन वजनाचें पोलाद आयात करण्याची व्यवस्था केली आहे. छोट्या उद्योगधंद्यांच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनें आयातींत भरपूर विविधता ठेवण्यांत आली आहे. एकूण पोलादापैकी सुमारें ३०,६३५ टन पोलाद ह्यापूर्वीच आयात झालेलें आहे, अशी माहिती राज्यसभेंत सांगण्यांत आली.

**रेल्वेच्या सिग्नलची यंत्रसामग्री**— रेल्वेच्या सिग्नलसाठी लागणाऱ्या साहित्याचे उत्पादनांत वाढ करण्यांत आली आहे. १९५९–६० सालांत अशा प्रकारची १ कोटी रुपयांची यंत्रसामग्री तयार करण्यांत आली. रेल्वेवर सुरक्षितेसाठी वापरण्यांत येणाऱ्या साहित्याचें व सिग्नलिंगच्या यंत्रांचें उत्पादन वाढविण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**विजेच्या स्फोटाचें तपमान**—रशिअन पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनीं ढगांच्या घर्षणानें उत्पन्न होणाऱ्या विजेचें तपमान मोजण्यांत यश मिळविलें आहे. हें तपमान २०,००० सेंटिग्रेड असतें असा त्यांचा शोध आहे. सूर्याच्या सपाटीवरील भागांत जितकी उष्णता असते, त्याच्या तिप्पट ही उष्णता आहे. शास्त्रज्ञांनीं ढगांच्या गडगडाटामुळें उत्पन्न होणाऱ्या शक्तीचीहि मोजणी केली आहे.

**डॅग हॅमरशील्ड ह्यांचें स्मारक**—कांगोमधील विमान-अपघातांत मरण पावलेले संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सर चिटणीस डॅग हॅमरशील्ड ह्यांचें स्मारक म्हणून एक शास्त्रीय संशोधन केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. केंद्राच्या स्थापनेसाठीं ८॥ लाख पौंड खर्च येणार असून तें स्वीडनमध्यें स्थापन करण्यांत येईल. संशोधनाच्या कामीं १४० परदेशीय शास्त्रज्ञांची मदत घेण्यांत येणार आहे.

## बँक डिपॉझिट इन्शुअरन्स योजना

### १ जानेवारी, १९६२ पासून अंमलांत येणार

येत्या जानेवारीपासून, सर्व शेड्यूल्ड बँकांना आपल्या ठेवींचा विमा डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनकडे उतरावा लागेल. प्रत्येक १०० रुपयांस ५ नवे पैसे, असा हप्त्यांचा दर राहील. ह्याचा अर्थ, बँकांना दरसाल सुमारें १ कोटी रुपये हप्त्यांच्या पोटीं कॉर्पोरेशनला द्यावे लागतील. प्रत्येक ठेवीदाराच्या १,५०० रुपयांच्या ठेवीला विम्याचें संरक्षण मिळेल. त्यायोगें सुमारें ८०% ठेवीदार ह्या योजनेंत येतील आणि ठेवींच्या एकूण रकमेपैकी २४% रक्कम विम्याच्या संरक्षणाखालीं येईल. हप्त्यांचा बोजा बँकांनाच सोसावा लागेल; त्याचा भार ठेवीदारांवर टाकता येणार नाहीं. बँका जेवढा हप्ता भरतील, त्यावर बँकांना इन्कम टॅक्स रिफंड मिळणार आहे. कॉर्पोरेशन विम्याचा हप्ता जास्तींत जास्त दर शेंकडा १५ नवे पैसे ठेवूं शकेल. कॉर्पोरेशनचे स्वतःचे फंड वाढावे, ह्यासाठीं तिला पहिलीं पांच वर्षें इनकम्‌टॅक्स आणि सुपर-टॅक्स माफ करण्यांत आला आहे.

## खाजगी कारखाना सहकारी होणार

सध्यां खाजगी मालकीचा असलेला चांगदेव शुगर मिल्स हा कारखाना लवकरच सहकारी करण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यानें ३,७०० एकर जमीन ऊंस लावण्यासाठीं शेतकऱ्यांकडून खंडानें घेतलेली आहे. ह्या शेतकऱ्यांची नुकतीच एक बैठक झाली व तींत एका सहकारी शेतकी संस्थेची स्थापना करण्याचें ठरलें. त्याचप्रमाणं चांगदेव शुगर मिल्स खरेदी करून तो कारखाना सहकारी तत्त्वावर चालविण्याचें ठरविण्यांत आलें. कारखान्याच्या खरेदीसाठीं ४० लाख रुपयांचें भांडवल जमविण्यांत येणार आहे.

## सहकारी शेतीच्या प्रायोगिक योजना

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतांत ३२० सहकारी शेतीच्या प्रायोगिक योजना चालू करण्याचे मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. त्यापैकी १२ योजना मद्रास राज्यांत चालू करण्यांत यावयाच्या आहेत. मद्रास सरकारनें ह्या बाबतींत रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ह्यांना सूचना दिल्या आहेत. १९६१-६२ सालांत तीन सहकारी शेतीसंस्था स्थापन करण्यांत येण्याची शक्यता आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठी

☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पांवडर ☆

किर्लोस्कर
स्थापना १८८८
इलेक्ट्रिक पंपिंग सेट




भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतांत. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४१ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतींच्या आकर्षक योजना

(१) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर २॥ टक्के
(२) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३। "
(३) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

# अर्थ

बुधवार, ता. ६ डिसेंबर, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सिमेंटच्या नव्या कारखान्यांना परवाने

हिंदमधील सर्वच राज्यांतून गेलीं कांहीं वर्षे सिमेंटचा तुटवडा भासत आहे. गुजरात राज्यांतील सिमेंटच्या टंचाईविषयीं चर्चा करण्यासाठी सेंट्रल गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे नुकतीच एक परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेचें उद्‌घाटन गुजरात राज्याचे सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री श्री. प्रेमजीभाई ठक्कर ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सिमेंट तयार करणाऱ्या १६ नव्या कारखान्यांना परवाने देण्यांत आलेले आहेत. त्याशिवाय सध्यां चालू असलेल्या कारखान्यांचा उत्पादनांतील हिस्सा वाढवून देण्यांत आलेला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सिमेंटच्या उत्पादनाचें लक्ष्य १·४६ कोटी टन ठरविण्यांत आलें आहे. वरील उपायांमुळें तें गांठणें शक्य होईल असा अंदाज आहे. भारतांत शेती आणि उद्योगधंदे ह्यांची झपाट्यानें वाढ होत आहे. त्यामुळें सिमेंटची टंचाई विशेषच जाणवत आहे. गुजरात राज्याला दरसाल सुमारें १२ लाख टन सिमेंटची जरूर लागते. पण दरसाल फक्त ४,६०,००० टन सिमेंटचाच पुरवठा करण्यांत येतो. अर्थात्‌च राज्याच्या गरजेच्या मानानें तो अपुरा पडतो. देशांत एकूण ३४ सिमेंटचे कारखाने आहेत, व ते दरसाल ८८ लाख टन सिमेंट उत्पादन करूं शकतात. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सिमेंटच्या उत्पादनाचें लक्ष्य १·३ कोटी टन ठरविण्यांत आलें होतें. पण कांहीं कारखान्यांनीं उत्पादन स्थगित ठेवलें तर कांहींनीं उत्पादनांत कपात केली. त्यामुळें उद्दिष्ट गांठण्यांत यश आलें नाहीं. म्हणून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सिमेंटच्या नव्या कारखान्यांना परवाने देणें जरूर झालें. खुद्द गुजरात राज्यांत सिमेंटचे ४ कारखाने आहेत आणि ते सर्व मिळून दरसाल १० लाख टन सिमेंट निर्माण करूं शकतात. त्यामधूनच गुजरातला आपल्या वांट्याचें सिमेंट मिळतें.

---

## विमानानें प्रवास करणाऱ्यांची गर्दी

भारताला विमानानें येणाऱ्या प्रवाशांची गर्दी ह्या वर्षी खूपच वाढली आहे. दिल्ली येथें आणि निरनिराळ्या राज्यांच्या राजधान्यांतून अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा भरत आहेत. त्यांना हजर राहण्यासाठी परदेशांतून मोठ्या संख्येनें लोक येत आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेनें १९६१ साल हें पूर्वेकडील देशांना भेट देण्यासाठी म्हणून मुद्दाम निवडलें आहे. त्याचप्रमाणें परदेशांतील प्रवाशांना भारतांत प्रवास करण्यास उत्तेजन देण्यासाठी भारत सरकारनेंहि १९६१ सालच निवडलें आहे. त्यामुळेंहि प्रवाशांची गर्दी खूपच जास्त झाली आहे. भारतामधील अंतर्गत विमान-वहातूक इंडिअन एअर लाइन्स ही कंपनी करते. ह्या कंपनीच्या मद्रासहून सुटणाऱ्या विमानांतून जागा मिळणें गेल्या कांहीं दिवसांत मुष्किलीचें झालें आहे. मद्रासहून नवी दिल्ली, मुंबई आणि कलकत्ता ह्या ठिकाणीं जाणाऱ्या विमानांतून जागा मिळणें तर विशेषच अवघड झालें आहे. मद्रासहून उत्तरेकडे जाणारे प्रत्येक प्रवासी विमान संपूर्णपणें भरलेलें असतें. मुंबई, कलकत्ता व नवी दिल्ली ह्या शहरांना जाण्यासाठी २० प्रवाशांचीं नांवें कंपनीच्या प्रवाशांच्या यादीवर नेहमींच शिल्लक असतात. ऐनवेळीं प्रवास करूं इच्छिणाऱ्या लोकांची तर गोष्टच बोलावयास नको. जागा आधीं राखून ठेवलेल्या प्रवाशांपैकीं कोणी आले नाहीं तरच त्यांना जागा मिळण्याची शक्यता असते. त्यांतच इंडिअन एअर लाइन्स कंपनीचीं कांहीं विमानें कांहीं ना कांहीं कारणानें उड्डाण करण्यासारखीं नाहींत. त्यामुळें प्रवाशांची गर्दी कमी होण्यास विलंब लागत आहे. येत्या जानेवारींत भरणाऱ्या राष्ट्रीय शेतकी प्रदर्शनासाठी जपान, अमेरिका व पश्चिम जर्मनी ह्या देशांतील प्रवासी आताच येऊं लागले आहेत. त्यामुळें गर्दींत अधिकच भर पडली आहे.

---

## मुंबई बंदराच्या विकासासाठी कर्ज

मुंबईमधील गोद्यांची सुधारणा करण्यासाठी व बंदराचा विकास घडवून आणण्यासाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि जागतिक बँक ह्यांच्या दरम्यान वाटाघाटी झाल्या. बँकेचे दोघे प्रतिनिधी ह्या कामासाठी मुंबईला आले होते. त्यांच्याकडून जागतिक बँकेला अहवाल सादर करण्यांत येईल आणि नंतर बँक भारत सरकारशीं ह्यासंबंधीं अधिक वाटाघाटी करील. बँकेकडून सुमारें ९ कोटी रुपये कर्ज मिळण्याची शक्यता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत मुंबई पोर्ट ट्रस्ट बंदराच्या सुधारणेवर २६ कोटी रुपये खर्च करणार आहे. त्यांपैकीं ९ कोटी रुपये खर्च परदेशीय चलनांत करावा लागेल असा अंदाज आहे. परदेशीय चलनाची सोय बँकेमार्फत कर्जाच्या रूपानें करण्यांत येईल.

---

## आर्थिक विकासाचा हेतु काय असावा ?

नॅशनल कौन्सिल ऑफ वुइमेन इन् इंडिया ह्या संघटनेची द्विवार्षिक परिषद् मुंबई येथें भरली होती. परिषदेच्या तिसऱ्या बैठकींत खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांचें भाषण झालें. ते म्हणाले कीं, कोणतेंहि आर्थिक विकासाचें कार्य अशा रीतीनें करण्यांत आलें पाहिजे कीं, विकास-कार्याच्या पूर्तीनंतर लोकांना अधिकांत अधिक सुख मिळालें पाहिजे. औद्योगिक उन्नति घडवून आणतांना लोकांचें जीवन अधिक पूर्ण आणि सुखमय होण्याची दक्षता घेतली पाहिजे. परिषदेंत बोलतांना इतर कांहीं वक्त्यांनीं शहरांतील जीवनामुळें माणसाच्या मनावर अलीकडे फार ताण पडूं लागला आहे असें सांगितलें आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीं आपलें लक्ष शहरापासून दूर वळवून खेड्यांकडे द्यावें अशा सूचना केल्या.

---

# सहकारी संस्थांच्या सभेचा अध्यक्ष कसा असावा ?

"सहकारी संस्थेचा अध्यक्ष हा त्या संस्थेचा प्रमुख कार्यकर्ता असतो. तो कर्तबगार, सहकार्याचा पुरस्कर्ता, कष्टकर्त्याचा व तळमळीचा कार्यकर्ता असतो. संस्थेचें दैनंदिन कामकाज त्यास माहित असावें लागतें. त्याचप्रमाणें संस्थेचे पोटनियमाचें त्यास अद्ययावत ज्ञान हवें असतें. त्याचप्रमाणें सोसायट्यांचा कायदा-कानू यांचेंहि ज्ञान आवश्यक असतें. संस्थेच्या सभा चालवतांना ज्या गोष्टींची अध्यक्षांना माहिती असणें जरूर असतें त्या गोष्टींचा आतां आपण उहापोह करणार आहोंत." [ श्री. बी. एन्. पाटील बी. ए. (ऑनर्स), जी. डी. सी. अँड ए., कोऑपरेटिव्ह ऑफिसर, नाशिक, ह्यांनीं 'सहकारी संस्थांच्या सभा' ह्या नांवाचें मार्गदर्शक पुस्तक लिहिलें आहे. त्यांतून ही चर्चा येथें उद्धृत केली आहे ]

सोसायटीचा अध्यक्ष हाच साधारण सभेचा अध्यक्ष असतो आणि त्याचे गैरहजेरींत उपाध्यक्ष हा अध्यक्षाचें काम चालवतो. हे दोन्ही पदसिद्ध अध्यक्ष गैरहजर असल्यास सभासद आपल्या-पैकी एकास अध्यक्ष निवडतात आणि सभेच्या कामकाजास सुरवात होते. अशा वेळीं नंतर मध्येंच जर पदसिद्ध अध्यक्ष अगर उपाध्यक्ष हजर झाले तर विचित्र परिस्थिति निर्माण होते. त्यासाठी अशा वेळीं सभासदांपैकी एकास अध्यक्षपद देण्याची पाळी आल्यास ती सूचना मांडतांना "पदसिद्ध अध्यक्ष येईपर्यंत श्रीयुत अमुक अमुक ..............यांनीं सभेचें कामकाज चालवावें" असा उल्लेख असावा. म्हणजे पेचप्रसंग निर्माण होणार नाहीं. जेथें अध्यक्ष सभासदांपैकीं निवडावयाचा असतो, त्या ठिकाणीं सभेची वेळ झाल्यानंतर आणि आवश्यक कोरम झाला अशी खात्री करून अध्यक्षांची सूचना आणावी. आजचे अध्यक्षस्थान "श्रीयुत अमुक अमुक............यांनीं स्वीकारावें" अशा प्रकारची सूचना असावी व तीस अनुमोदन असावें. दुसरें नांव सभेपुढें न आल्यास आमंत्रक अधिकाऱ्यानें सदरचे इसम बिनविरोध अध्यक्ष म्हणून निवडून आलेत असें जाहीर करावें. दोन सूचना आल्यास त्या मतास टाकून निकाल जाहीर करावा. मतास दोन सूचना टाकावयाची पाळी आल्यास मतमोजणी ही आमंत्रक अधिकाऱ्यानें करून निर्णय द्यावा. पहिलें नांव सुचविल्यानंतर दुसरें नांव येतें किंवा काय, यासाठी दोन मिनिटें वाट पाहावी.

अध्यक्ष झाल्यानंतर अध्यक्ष या नात्यानें त्यानें सभेत शिस्त आणि शांतता राखली पाहिजे. अध्यक्ष शीघ्रकोपी अगर चिडका नको. अध्यक्ष धीट प्रकृतीचा, निःपक्षपाती व न्यायी असावा. अध्यक्षानें एकदां स्थानापन्न झाल्यावर आपली जागा सोडूं नये. अध्यक्षस्थान सोडणें असल्यास तात्पुरतें दुसऱ्या कोणास अध्यक्ष-स्थान द्यावें, म्हणजे सभेचें कामकाज बंद पडणार नाहीं. खेळी-मेळीनें कामकाज चालवून व सर्व सभासदांना आपल्या बरोबर घेऊन जो अध्यक्ष सभा उत्तम रीत्या पार पाडतो आणि सभा चांगल्या तऱ्हेनें नियंत्रण करतो, चाललेल्या चर्चेला नीट वळण लावतो, त्यास चांगला अध्यक्ष म्हणावें. सभाविषयक नियमांना अनुसरून सभा नियंत्रित झाली पाहिजेच, पण त्या बरोबरच अध्यक्ष आपापल्या विषयांविषयीं व संस्थेविषयीं माहितगार असावा लागतो. सभेत नाना वृत्तींचीं माणसें एकत्र येत असल्यामुळें क्षुद्र टीकेला न जुमानणारा, आपल्या बोलण्यानें विधायक वातावरण निर्माण करणारा, प्रासंगिक विनोदानें सभेचें वातावरण प्रसन्न ठेवणारा, नम्रतेनें पण निश्चयानें निर्णय देणारा, न्यायबुद्धीचा, हजरजबाबी, सभासदांचें म्हणणें शांतपणें ऐकण्याची संवय असलेला, विरोधाला योग्य वाव देणारा व सभामोडयांना शिस्त लावणारा अशा प्रकारचा असावा, अशी अपेक्षा आहे. या विविध भूमिका-तून जीं माणसें तावून सुलाखून निघतात आणि आपल्या अध्यक्षते-खालीं असलेल्या सभा नियंत्रित करतात ते नमुनेदार अध्यक्ष म्हणून मानावयास हरकत नाहीं.

कोणत्याहि सभेचा अध्यक्ष या नात्यानें अध्यक्षांचीं कांहीं विशिष्ट कर्तव्यें व अधिकार आहेत. कोणतीहि सभा सुरू करण्या-पूर्वी सभेची नोटीस सोसायटीच्या नियमाप्रमाणें आहे किंवा नाहीं याबद्दल दक्षता घेणें. सभा चालू होण्यापूर्वी योग्य ती गणसंख्या (कोरम) आहे किंवा नाहीं हें पहाणें. त्याचप्रमाणें सभेची ठरलेली वेळ झाली आहे किंवा नाहीं तें पहाणें. कारण सभा ठरलेल्या वेळेपेक्षा अगोदर सुरू करतां येणार नाहीं. पण ठरलेल्या वेळेपेक्षां थोडा उशीर झाला तर चालेल. सभा सुरू झाल्यावर मात्र कोरम पाहाणें अध्यक्षांचें काम नाहीं. मात्र सभा सुरू झालेवर कोरमचा प्रश्न सभासदांकडून उपस्थित झाल्यास तशी खात्री करून घेऊन सभा पुढें चालवावी, व कोरम नसेल तर तहकूब करावी. यदा-कदाचित् कोरम नसतांना कामकाज झालें व ते नंतर सभासदांनीं निदर्शनास आणून दिले तरी झालेलें कामकाज बेकायदेशीर होत नाहीं. निमंत्रित अशा सभासदांचीच ती सभा आहे किंवा काय हें काटेकोरपणें पहाणें, नियमाप्रमाणें सभेचें कामकाज आणि सभा संचालन करणें, नोटीसींतील कार्यक्रम पत्रिकेंत ( अजेंडा ) ठरविलेले असेल त्याप्रमाणें विषय चर्चेला टाकणें आणि त्याच क्रमानें विषय घेणें, कार्यक्रम पत्रिकेंतील (अजेंडा) विषयाचा क्रम बदलावयाचा असल्यास त्यास साधारण सभेची मंजुरी घेतली पाहिजे. म्हणजेच सदरचा बदल आवश्यक आहे असें कुणी सुचविल्यास आणि सभेची त्यास संमति असल्यास कार्यक्रम पत्रिकेंतील विषय क्रमां-कांत बदल करतां येईल. मात्र अध्यक्षास जो विषय वादातीत व ज्याचर चर्चेची गरज नाहीं असा विषय, कार्यक्रम पत्रिकेवरील इतर विषय सभेला न विचारतां मागे ठेवून स्वतःचे अधिकारांत आधीं ठेवतां येतो. सदर बदल करण्यानें जर सभेच्या कामांत व्यत्यय येणार नाहीं असें वाटलें तर अध्यक्ष स्वतःचे अधिकारांत असा बदल करूं शकतो. मात्र त्यानें शक्यतोंवर असें करणें टाळलेलें बरें.

याबाबत वाद उपस्थित झाला असतां बॉम्बे को-ऑप. ट्रिब्यूनलनें अपिल नंबर १०६ सन १९५४ चे मालवण अर्बन को-ऑप बँक विरुद्ध श्री. पांडुरंग सयाजी पै या केसमध्यें दिला आहे. या केसमध्यें अध्यक्षानें डायरेक्टरांचे इलेक्शनचा निर्णय सभा सुरू होतांच इतर विषय बाजूला ठेवून पहिल्यानें जाहीर केला होता आणि त्यामुळें वाद उत्पन्न झाला असतां वरीलप्रमाणें निर्णय ट्रिब्यूनलनें दिला. ट्रिब्यूनलनें सदर निकाल देतांना वादातीत विषय अगोदर घेतला म्हणून सभासदांच्या कोणत्याहि हक्कास बाध आला नाहीं किंवा पोटनियमाविरुद्ध त्यांत कांहीं घडलें नाहीं किंवा नैसर्गिक न्यायाच्या विरुद्धहि त्यांत कांहीं झालें नाहीं आणि अध्यक्षांचें त्यांत कांहीं चुकलें नाहीं असें म्हटलें. सभेपुढे येणाऱ्या सूचना, ठराव, उपसूचना कायदेशीररीत्या बरोबर येतात किंवा नाहीं याबद्दल दक्षता घेणें. चर्चेसाठीं मांडलेल्या विषयावर योग्य वादविवाद होण्यास आणि वक्त्याला विशिष्ट वेळ देण्याचें अध्यक्षांनीं ठरवावें. ज्या कुणा सभासदास संधि पाहिजे असेल त्यास चर्चेची संधि दिली पाहिजे. चर्चा विषयाला धरून

असेल तरच चालू ठेवणें, अप्रस्तुत, असंबद्ध अशी चर्चा बंद करणें, जो विषय सभेपुढें नसेल त्यावर बोलू न देणें, एका वेळीं एका व्यक्तीलाच बोलू देणें, विधी प्रश्न, हरकतीचे मुद्दे, कायदेशीर मुद्दे, कामकाजी मुद्दे अथवा कायद्याचे मुद्दे (पॉईंट ऑफ ऑर्डर) उपस्थित झालेच तर त्यावर नियमानुसार निर्णय देणें, चर्चा संपल्यावर अगर पुरेशी चर्चा झाल्यावर चर्चा बंद करणें, आणि सभेचें मत घेऊन तें जाहीर करणें, मतदानाची पाळी आल्यास मतदान घेणें, पोल मागितल्यास नियमाप्रमाणें पोल देणें, सभा नियमाप्रमाणें तहकूब अगर बरखास्त करणें, सभेच्या प्रोसिडिंगची टिपणें अगर नोंद व्हावी म्हणून स्वतः टिपणें घेणें आणि सेक्रेटरी अथवा मॅनेजर यांस त्याची नोंद घेणेसंबंधीं सूचना देणें, असें कर्तव्याबरोबरच अध्यक्षास सभेचे अध्यक्ष या नात्यानें कांहीं अधिकार असतात.

(१) सभेंत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कोणाहि सभासदास सभेबाहेर घालवणें. गैरवर्तन करणाऱ्या सभासदास प्रथम ताकीद द्यावी व नंतर सभा सोडण्यास सांगावें. असा सभासद बाहेर न गेल्यास त्यास जबरीनें बाहेर काढण्याचा अधिकार अध्यक्षास आहे. अशा वेळीं प्रतिकार केल्यास तो सभासद गुन्हेगार होतो.

(२) सभासदाव्यतिरिक्त इतर इसम सभेंत आहेत असें वाटल्यास त्यांना बाहेर जाण्यास सांगण्याचा अध्यक्षांस अधिकार आहे.

(३) शांततेनें काम चालणें अशक्य झाल्यास आणि शांतताभंग अटळ असला तर अध्यक्षांस सभा तहकूब करण्याचा अधिकार आहे.

(४) अप्रामाणिक हेतूनें एखाद्या सभासदानें सभातहकुबीची सूचना आणली व अध्यक्षांनीं सभा तहकूब केली आणि सभास्थान सोडलें तर राहिलेल्या सभासदांना आवश्यक गणसंख्या (कोरम) असेल तर अध्यक्ष नेमून सभाकार्य चालवतां येतें; आणि तें कायदेशीर ठरतें. अधिकार आहे म्हणून अप्रामाणिक कामासाठी सभा तहकूब करणें इष्ट नसतें, म्हणून हा अधिकार अध्यक्षांनीं जपून वापरला पाहिजे.

(५) तांतडीचे प्रश्न निर्माण झाल्यास त्यावर निर्णय देणें. तसेंच सभेचें संचालन करीत असतांना सोसायटीचे पोट-नियमानुसार व प्रामाणिकपणें व कायद्याप्रमाणें जे निर्णय दिले असतील ते सभेनें अखेरचे मानले पाहिजेत. या निर्णयावर कुणासहि चर्चा न करूं देण्याचा अध्यक्षांचा अधिकार आहे. अध्यक्षाचे निकालामुळें अन्याय झाला आहे असें वाटत असल्यास त्याबद्दल कोर्टांत दाद मागतां येतें. अध्यक्ष नियमाप्रमाणें निर्णय देत नसल्यास त्यावर अविश्वासाचा ठराव सभेपुढें आणतां येतो.

(६) अध्यक्षास चर्चेचें नियमन करण्यासाठी प्रत्येक वक्त्याच्या भाषणाला कालमर्यादा घालतां येते. त्याचप्रमाणें त्यास वक्त्यांच्या संख्येवरहि मर्यादा घालण्याचा अधिकार आहे.

अध्यक्ष हा एकाच वेळीं सभासद व अध्यक्ष असतो. सभासदाचे अधिकार व हक्क तो गमावत नाहीं. म्हणून त्यांस चर्चेत भाग घेण्याचा अगर ठराव, सूचना, उपसूचना आणण्याचा इतर सभासदांइतकाच अधिकार आहे; पण अध्यक्षांनीं मार्गदर्शनाचें काम करावें. चर्चेत क्वचितच भाग घ्यावा व निःपक्षपाती राहावें. अध्यक्षांस प्रत्येक सोसायटीचे पोटनियमाप्रमाणें समान मतप्रसंगीं जादा मताचा अधिकार आहे. अध्यक्षांनीं हा जादा मताचा अधिकार प्रसंग पाहून वापरावा.

## जर्मनीमधील विद्यार्थ्यांचीं वृत्तपत्रें

पश्चिम जर्मनीमधील बऱ्याच माध्यमिक शाळांतील विद्यार्थी आपलें स्वतःचें साप्ताहिक अगर पाक्षिक प्रसिद्ध करूं लागले आहेत. दर तीन शाळांमागें एका शाळेंतील विद्यार्थी अशा नियतकालिकाचें प्रकाशन करीत आहेत. अशा वृत्तपत्रांची संख्या अवघी १०० होती. पण आतां ती ५०० पर्यंत वाढली आहे. ह्या वृत्तपत्रांना शाळांतील घडामोडींची माहिती तर असतेच; पण त्याशिवाय राजकीय वार्ताहि दिलेल्या असतात. प्रचलित राजकारणाविषयीं आस्था निर्माण करण्याचें काम हीं वृत्तपत्रें चांगल्या रीतीनें करतात. शिवाय चालविण्याच्या कामाचा अनुभवहि मुलांना मिळतो. शाळांच्या वृत्तपत्रांतून आतां जवळ जवळ १०,००० विद्यार्थी काम करतात. त्यांपैकीं संपादक, वार्ताहर, टीकाकार ह्यांचीं कामें तर करतातच. पण वृत्तपत्रांची तांत्रिक बाजू संभाळण्याचें कामहि बरेच विद्यार्थी करतात.

## गुजरात सरकारची उद्योगविषयक पत्रिका

गुजरात राज्यांत नवे उद्योगधंदे काढण्यास कितपत वाव आहे त्याची माहिती लोकांना व्हावी म्हणून राज्य सरकारनें दर तीन महिन्यांनीं एक उद्योगपत्रिका काढण्याचें ठरविलें आहे. ह्या पत्रिकेंत नव्या उद्योगधंद्यांविषयीं अद्यावत माहिती देण्यांत येईल. पत्रिका सरकारच्या औद्योगिक खात्यातर्फे प्रसिद्ध केली जाईल. निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील तांत्रिक प्रगतीची माहिती, व्यापारी व औद्योगिक दृष्टीनें केलेल्या पहाण्या व त्यासंबंधीचे अहवाल, परदेशीय चलनाविषयींची परिस्थिति इत्यादि संबंधी पत्रिकेंत माहिती देण्यांत येईल. त्याशिवाय उद्योगधंदे काढण्यासाठी लागणारे दाखले, आयातीचे परवाने इत्यादि मिळविण्याची पद्धत आणि त्यासंबंधीचे नियम ह्यांचीहि माहिती देण्यांत येईल.

## कॅमेऱ्याचा डोळा चुकविणारा दरोडेखोर

न्यूयॉर्कमधील एका बँकेंत दरोडेखोर शिरला, तशी तेथील कारकुनानें स्विच दाबून, लपवून ठेवलेले दोन फिल्म कॅमेरे सुरू केले. दरोडेखोर थैल्या घेऊन पळून गेल्यावर, कॅमेऱ्यांतील ८०० चित्रांची फिल्म डेव्हलप करण्यांत आली. त्यांत घाबरलेले नोकर आणि गिऱ्हाईक स्पष्ट दिसत होते; फक्त दरोडेखोर चित्रांत कुठंच आढळला नाहीं!

## कॉफीच्या निर्गतींत वाढ


गेल्या वर्षीपेक्षा चालू वर्षी भारतानें सुमारें दुप्पट कॉफी निर्गत केली. गेल्या वर्षी १७,००० टन कॉफी परदेशीं पाठविण्यांत आली होती; यंदा ३१,००० टनांची निर्गत झाली. भारतांतील कॉफीचें उत्पादन (४६,००० टन) जागतिक उत्पादनाच्या फक्त एक टक्का भरतें. सुमारें २,५०,००० एकरांच्या लागवडीपैकी म्हैसूरमध्यें ५७%, मद्रासमध्यें २४% आणि केरळांत १९% लागवड झालेली आहे. पांच वर्षांत एकूण उत्पादन ८०,००० टनांवर नेण्यांत येणार आहे.

## परदेशीय फर्म्समधील भारतीय नोकरांच्या संख्येंत वाढ

परदेशीयांच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील फर्म्समध्यें १,००० आणि त्याहून अधिक रुपये पगाराच्या वेतनश्रेणींतील भारतीय नोकरांच्या प्रमाणांत आणखी वाढ झाली आहे. १ जानेवारी, १९६१ रोजीं ह्या वेतनश्रेणींतील एकूण ७०·१ टक्के जागांवर भारतीय होते; १९५८ मधील हेंच प्रमाण ५५·२ टक्के होतें.

# तुम्ही व तुमची पॉलिसी


तुमची आयुर्विमा पॉलिसी ही सर्वांत महत्वाची ठेव आहे. [illegible] जराहि दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. पुढें दिलेल्या [illegible] गोष्टी पूर्ण करण्यास उशीर केलांत, तर पॉलिसीवरील [illegible] मिळण्यासहि उशीर होईल.





वयाचा दाखला :– [illegible] नमूद केलेल्या तुमच्या वयाचा दाखला तुम्ही सादर केला आहे कां? नसल्यास, तो [illegible] कसा देतां येईल हे [illegible] एजंटला विचारा.




मालकी :– पॉलिसीवरील रक्कम तुमच्या पश्चात् कोणाला मिळावी हें तुम्ही निश्चित केलें आहे कां? नसल्यास इच्छित व्यक्तिची (nomination) निवड करून किंवा उत्तराधिकारी (assignment) नेमून तशी नोंद तावडतोब तुमच्या पॉलिसींत करून घ्या. त्यामुळें तुमच्या प्रिय माणसांना पैसे मिळण्यास कायद्याच्या अडचणींतून जावें लागणार नाहीं.



पॉलिसीची काळजी :– तुमची पॉलिसी हा एक महत्वाचा दस्तऐवज आहे. तिच्या बळावरच तुम्हाला किंवा तुमच्या वारसाला पॉलिसीवरील रक्कम मिळवितां येईल. तेव्हां तिचे काळजीपूर्वक जतन करा. पैसे मिळण्याच्या वेळीं ती कॉर्पोरेशनला परत करावी लागेल.




हप्त्याचा दिवस :– ठरलेल्या दिवशीं किंवा फार तर सवलतीच्या काळांत हप्ता भरण्याची न चुकतां व्यवस्था करा. हप्ता चुकल्यानें पॉलिसी रद्द होईल व ज्या हेतूनीं तुम्ही पॉलिसी घेतलींत ते सफल होणार नाहींत.



पत्ता बदलल्यास :– कधींहि तुमचा पत्ता बदल्यास योग्य त्या युनिट ऑफिसला किंवा कॉर्पोरेशनच्या डिव्हिजनल ऑफिसला तो कळविण्यास विसरूं नका. त्यामुळें पत्रें, प्रिमियम नोटीस, पावत्या इत्यादि तुम्हाला चटकन मिळत राहतील.

## आयुर्विम्याला पर्याय नाहीं

PRA-61-0



श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांचे गुजराती अनुवाद

| सुखी जीवननी पगदंडी | सदाचारने पगले | मधुमालती |
|---|---|---|
| ( तिसरी आवृत्ति ) | ( दुसरी आवृत्ति ) | ( छापत आहे ) |
| [ कण आणि क्षण ] | [ पुढे पाऊल ] | [ तुमचें स्थान कोणतें ] |

## सहकारी संस्थांच्या कायद्यांतील कांहीं बाधक तरतुदी

( लेखक:- श्री. ना. वि. भोंडे, वकील, पुणें २ )

महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा दि. ९ मे १९६१ रोजीं प्रसृत झाला असून त्याखाली करावयाच्या नियमांचा मसुदा राज्य-सरकारनें प्रसिद्ध केला व त्यासंबंधाच्या हरकती मागविल्या आहेत. नवीन कायदा लोकाभिमुखीपेक्षा सरकाराभिमुखी अधिक आहे. पण गेल्या पन्नास वर्षांचा अनुभव, लोकनियुक्त सरकारची स्थापना व कल्याणकारी समाजरचनेचें ध्येय हीं लक्षांत घेतां नवीन धोरणाचें समर्थन करतां येईल. या कायद्याच्या भाग ११ मध्यें नवीन विकास बँकांसंबंधी तरतूद असून त्याबद्दलचे नियम, नियमांचा विभाग नंबर १०, अनुक्रम नंबर ९३ ते १०६ यांत नमूद केले आहेत.

### मानी माणसाला खटकणाऱ्या बाबी

जमीनविकास बँका नवीन योजनेनें स्वयंपूर्ण केल्या आहेत व कर्ज देणाऱ्या धनको बँकेला ऋणकोच्या जमिनी त्यांनीं कर्ज न फेडल्यास, कोर्टाचा अवलंब न करतांहि परस्पर विकण्याचा या बँकेचा सेक्रेटरी अगर मॅनेजर याला "खरेदीचा दाखला" देण्याचा अधिकार नियम नंबर १०१, नमुना नं. टी अन्वयें दिला आहे. दिवाणी कोर्टांत अशा दाखल्याला "विक्रीचें" सर्टिफिकेट म्हणतात व अशी विक्री करण्यापूर्वी घ्यावी लागणारी दक्षता नियोजित नियमांत समाविष्ट केली आहे. पण नवीन तरतुदी वाचतांना कांहीं गोष्टी मानी शेतकऱ्यांस खटकल्यावांचून राहणार नाहींत. सावकारी कायदा ( मनी लेंडर्स ॲक्ट ) अंमलांत आल्यामुळें शेतकऱ्यांस बहुतेक सहकारी संस्थांकडून कर्ज मागण्याची पाळी येते. पण हा अर्ज बँकेच्या रिसिव्हिंग ऑफिसरनें तो "सार्वजनिक चौकशी अंमलदाराकडे" पाठविला पाहिजे व सदर अर्जदार व जमिनी ज्या गांवीं असतील त्या त्या गांवांतील चावडीवर जाहीर नोटीस देऊन कोणाचीहि हरकत असल्यास ती त्यांनीं कळवावी, असा दंडक नियम नं ९३ (८) नें घातला आहे. ह्या नोटिशीनें कर्जाचा हेतु जमीनसुधारणा अथवा उत्पादन, अर्जदारास सदर गोष्टी करण्याचा हक्क व नियोजित सुधारणेनें तारण जमिनीचा फायदा होईल, हीं विधानें सर्वांवर बंधनकारक व निर्णायक ठरतील असें नोटिशींत स्वच्छ म्हटलें जाणार आहे. ( नमुना नं. ८, पान नं. ४१६ पाहा. ) ही जाहिर नोटीस गांवची चावडी, बँकेची मुख्य कचेरी व शाखा कचेरी याच ठिकाणीं लावण्यानें भागणार नाहीं, तर मिळकतजप्तीच्या वेळीं त्याप्रमाणें टिमकी वाजवून, दवंडी पिटून त्यांतील मजकूर जाहीर केला पाहिजे.

### उचापतखोरांना वाव

अर्जदाराची जमिनीवर मालकी व वहिवाट आहे का नाहीं, त्यास मिळकतीची विल्हेवाट करण्याचा कायदेशीर हक्क आहे कीं कसें हें तपासणें हा बँकेचा हक्क आहे व ही चौकशी कोणीहि मान्य करील. हल्लींहि किंमत व आनुषंगिक गोष्टींकरितां लँड व्हॅल्युएशन अधिकारी व पंच जागेवर जातातच. पण सर्व गांवांत कर्ज मागणाऱ्यांच्या जमिनी व इतर बाबींसंबंधीं ढोलकें वाजवून दवंडी पिटवणें म्हणजे अर्जदाराच्या परतफेडीच्या ऐपतीचे धिंडवडे काढणें होय असाच लोक ह्याचा अर्थ समजतील. प्रत्येक गांवांत उचापती करणारे कांहीं विघ्नसंतोषी असतातच. ते वाटेल ती हरकत व हुसपट काढतील. शिवाय नोटिशींतील मजकूर इतका व्यापक आहे कीं "नियोजित कामानें सुधारणा अथवा उत्पादन होणार नाहीं.", "अर्जदारास दुरुस्ती करण्याचा हक्क नाहीं.", "सुधारण्यानें जमिनीचा फायदा होणार नाहीं" अशाबाबतहि तक्रारी देण्यास वाव असल्यामुळें कोणीहि मनुष्य उचापती करूं शकेल. या तक्रारीचा उपयोग अथवा दुरुपयोग चौकशी अंमलदार आपल्या लहरीप्रमाणें करूं शकेल. हा अंमलदार कर्ज देणाऱ्या बँकेचा अधिकारी नाहीं व त्याच्या निकालाविरुद्ध वरिष्ठाकडे अपील दिसत नाहीं. अशा स्थितींत लँण्ड डेव्हलपमेंट बँकांसंबंधींचा नियम नं. ९३ मधील जाचक भाग ठेवण्याचें कारण नाहीं व ते भाग वगळण्यांत यावेत व सहकार व विकास खात्यानें तशी दुरुस्ती मसुद्यांत अवश्य करावी.

---

### क्यूबाची साखर कम्युनिस्ट देश घेणार

क्यूबा देशांत तयार होणारी साखर विकत घेण्याचें कम्युनिस्ट राष्ट्र-गटांतील देशांनीं ठरविलें आहे. पुढील चार वर्षांत मिळून हे देश क्यूबाकडून ५० लाख टन साखर घेणार आहेत. १९६२ ते १९६५ ह्या चार वर्षांत रशिआ ३० लाख टन साखर विकत घेईल. कम्युनिस्ट चीन दरसाल १२ लाख टन साखर विकत घेईल. बाकीची साखर इतर कम्युनिस्ट देश विकत घेतील. क्यूबाची साखर अमेरिका मोठ्या प्रमाणावर घेत असे. परंतु क्यूबांत समाजवादी क्रांति झाल्यावर अमेरिकेनें साखर घ्यावयाचें बंद केलें. साखरेच्या निर्यातीवर क्यूबाच्या अर्थव्यवस्थेची मजबुती अवलंबून आहे.

---

### अधिक डॉक्टरांची जरूरी

भारतामध्यें एकंदरीनें डॉक्टर्सचा तुटवडा असल्यानें भारत-सरकार त्यांची संख्या वाढविण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहे अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्या विषया-संबंधीच्या चर्चेत भाग घेतांना मध्यवर्ती आरोग्य खात्याचे मंत्री श्री. बी. पी. करमरकर म्हणाले कीं, वैद्यकीय शिक्षण देणारीं कॉलेजें जितकीं काढतां येतील तितकीं काढण्यासाठी मदत करण्याचें सरकारचें धोरण आहे. दर ४,००० लोकसंख्येमागें एक डॉक्टर असावा असें ठरविण्यांत आलें तर भारताला १,१९,००० डॉक्टर्स लागतील. सध्यांची डॉक्टरांची संख्या ७२,००० आहे. १९६६ च्या सुमारास त्यांची संख्या ८२,००० पर्यंत जाईल असा अंदाज आहे.

---

### गुजरातमधील तेलशुद्धीचा कारखाना

सार्वजनिक मालकीच्या विभागांत स्थापन करण्यांत येणारा गुजरातमधील तेलशुद्धीचा कारखाना कोयाली ह्या ठिकाणीं काढण्यांत येणार असल्याची माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. कारखान्यासाठी १,३७४ एकर जागा लागणार असून ती ताब्यांत घेण्याची कायदेशीर तरतूद करण्यांत येत आहे. कारखान्याची जागा आणि इमारती इत्यादींचा तपशील रशिअन तज्ज्ञांकडे पाठविण्यांत आला आहे. कारखान्याच्या भांडवल उभारणीच गुजरात राज्यसरकारनें उचलावयाच्या वांट्याबाबत मध्यवर्ती सरकारशीं वाटाघाटी चालू आहेत.

---

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ... | ... | रु. ३९,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | ... | रु. १७,१०,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १९ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर आणि मध्यप्रांतांत मिळून बँकेच्या ७९ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडली जातात

— १९ जून, १९६१ पासून सुरू झालेल्या ५ नव्या शाखा —

**सावंतवाडी, मालवण, कुडाळ, बांदा व फोंडा**

—१ जुलै, १९६१ पासून सुरू झालेल्या ९ नव्या शाखा—

**लक्ष्मीरोड, पुणें २, कँप, पुणें १, लोणावळा, खोपोली, बारामती, श्रीरामपूर, ओझर (ताम्हट), परळ (मुंबई) व चिंचवड**

चिं. वि. जोग
जनरल मॅनेजर

स्थापना १९३६ ] [ शेड्यूल्ड बँक

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. हलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९६० |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०५,००० |
| ठेवी | रु. | २,२५००,०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,५९,००,००० |

— बदललेले व्याजाचे दर—

सेव्हिंग्ज खातीः—द. सा. द. शें. ३%
मुदत ठेवीः—एक वर्ष ,, ,, ४%
दोन वर्षें ,, ,, ४¼%
तीन वर्षें ,, ,, ४½%
चार वर्षें ,, ,, ४¾%
पांच अगर अधिक वर्षें ,, ,, ५%

शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिटसूच्या आकर्षक दरांसाठीं बँकेंत प्रत्यक्ष चौकशी करा.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

सेवा आणि सुरक्षितता
यांसाठी

# दि बेळगांव बँक लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रुपये | ८,००,००० |
| गंगाजळी | रुपये | ४,८६,००० |
| एकूण ठेवी | रुपये | १,७५,००,००० चे वर |

**बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.**

—आजच चौकशी करा—

होम सेव्हिंग्ज डिपॉझिटवर व्याज ३%
एक ते पांच वर्षें मुदत ठेवीवर व्याज ४% ते ५%

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अ. रा. नाईक,
बी. ए., बी. एस्सी., एलूएल्. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.